# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२५६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०४/२०१७

**१) सराफा दुकानातील सोन्याची पट्टीची चोरी केल्याने गुन्हा नोंद**

दिनांक ०६/०४/२०१७ चे १२.०० ते १४.०० वा. दरम्यान यातील हे सराफा दुकानदार यांचे कडुन आर्डर घेवुन दागीने बनवुन देण्याचे काम करतो यातील फिर्यादी हा सराफा दुकानदार पालांदुर यांचेकडे सोण्याचे मणी बनविण्याकरिता सोना आनण्यास गेला असता फिर्यादी नौकर म्हणुन काम करणाऱ्या यातील आरोपी याने त्याचे कडे मनी तयार करण्याकरिता दिलेले सोन्याचे पटटीचे तुकडे वजन ६४ ग्रॅम १३० मिली ग्रॅमसोना किंमती १लाख ६० हजार रूपयाचा माल चोरून नेल्याने फिर्यादी शेख समीमुददीन मुस्तफा शेख वय २५ वर्ष रा. कुलुपुकुर जिल्हा हुगली पोस्टे. पांडुहा पश्चिम बंगाल ह.मु. मधु मोहतुरे बाजार वार्ड लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३८१ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. चव्हान पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**२) चारचाकी वाहनाचे चारही चाकांची चोरी . :–**

दिनांक ०८/०४/२०१७ चे ००.०१ वा. ते ०४.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी ने आपली स्विप्ट डिझायर कार गाडी क्रं. एम.एच. ३६/एच. १९२५ ही गेट समोर उभी करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन रात्र दरम्यान कारचे चारही चाक किंमती ६०,०००/रू.चे चोरून नेल्याने फिर्यादी महेंद्र उत्तमराव वाकळेकर वय ३५ वर्ष रा. जान्वही ब्रास रेसीडेंन्सी स्टेशन रोड शास्त्री नगर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून आल्याने पोलीस स्टेशन भंडारा कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**३) अज्ञात वाहन चालकांने वाहन हयगयीने चालवुन उभ्या गाडीला धडक देवुन गाडीचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०४/२०१७ चे १६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा मा. मुख्य न्यायाधीश शर्मा मॅडम यांची गाडी क्र. एमएच ४५ व्ही २०३० ने सोबत घराकडे जात असता इंडीकॉम एटीएम जवळ रोडचे बाजुला गाडी उभी ठेवुन पैसे काढण्यास गेला असता यातील अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने चालवुन गाडीचे समोरचे भागाला धडक मारुन ५०,०००/–रु. चे नुकसान झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गिते पोस्टे भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**४) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

**अ)** दिनांक ०८/०४/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील आरोपी व फिर्यादी हे घराशेजारी राहणारे असुन त्याच्यात जाण्या येण्याच्या रस्त्यावरुन वाद असुन यातील फिर्यादी यांचे कंम्पाऊंड मध्ये यातील आरोपीने प्रवेश करुन फिर्यादीचे बहीनीला आडवे होवुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यशवंत श्रीरामजी सोनकुसरे वय ३७ वर्ष, रा. शास्त्रीवार्ड गणेशपुर भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३४१,४४८,२९४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**५) क्षुल्लक कारणावरुन मारहान, शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०८/०४/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा जिल्हा परीषद चौकाकडुन सायकलने घराकडे जात असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन रस्त्यात अडवुन तु कोर्टात कसा हजर होतेस असे म्हणुन बुक्कीने मारपीट करुन शिवीगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी रमेश हरीभाऊ मेहर वय ६० वर्ष, रा. गणेशपुर भंडारा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३४१,३२३,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. घरडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**६) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०८/०४/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरी दरवाजा बंद करुन घरी हजर यातील आरोपीने फिर्यादीचे घरी जावुन दरवाजा हाताने ठोकुन फिर्यादीस तुझी नणंद नाहीद खान कुठे आहे तिला बाहेर काढ माझे कामवालीला कचरा फेकण्यास मनाई का केली असे बोलुन भांडण, शिवीगाळ करुन जिवेमारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. शाहीन आरीफ शेख वय ३५ रा. नेहरु वार्ड कारधा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४४८,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहे.

**७) भांडण व शिवीगाळ करुन काठीने मारपीट, दुखापत करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०८/०४/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आपले शेता जवळ तळयाचे पाळीवर झाडाखाली बसला असता यातील आरोपी याने तलावातुन जनावरे चारुन घरी नेत असता तलावातील कचऱ्याला आग लावली असल्याने त्यामुळे फिर्यादीचे जवस व तणसीचे ढिग जळुन नुकसान झाल्याने फिर्यादी हा आरोपीस हटकण्यास गेला असता आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करुन काठीने मारपीट केली व उजव्या गालाला दाताने चावा घेवुन दुखापत करुन जखमी केले व शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादी युवराज पांडुरंग नंदेश्वर वय ५० वर्ष, रा. सोनपुरी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,४२७,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

**८) अल्टो गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०७/०४/२०१७ चे १५.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी संदीप चंद्रभाण कोडापे वय ३१ वर्ष, रा. पागोरा पुर्नवसन हा आपले मोटार सायकल क्र. एमएच ३६ ई ७८४२ सीबीझेड हिरो होन्डा ने अडयाळ कडुन पागोरा कडे जात असतांनी नेरला बसस्टॉप जवळ भंडारा कडुन येणारी अल्टो गाडी चे आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील गाडी भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला समोरुन धडक देवुन फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादींचे यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहे.

**९) नहराचे पाण्यात बुडुन मुलाचा मृत्यु. :-**

दिनांक ०७/०४/२०१७ चे १५.०० वा. दर यातील मृतक चंकीत शिवदास राऊत वय १० वर्ष, रा. टेंभणी हा मित्रासोबत नहराचे दुसऱ्या कडेला जाण्यासाठी नहराचे पाण्यात उतरले असता त्याला पोहता येत नसल्याने नहराच्या पाण्यात बुडुन मृत्यु पावल्याने फिर्यादी शिवदास छोटेलाल राऊत वय ३८ वर्ष, रा. टेभणी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे सिहोरा येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कदम पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहे.

**१०) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०८/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे भंडारा, वरठी, सिहोरा, आंधळगाव,साकोली व पवनी येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३२ लिटर हातभट्टी दारु किंमती २,२२०/–रु. माल व १८ लिटर ५४० मिली लिटर देशी दारु किंमती ५,२५०/–रु. असा एकुण ७,४७०/–रु. जप्त करण्यात आला आहे.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०८/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ६१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**प्रभारी नियंत्रण कक्ष अधिकारी**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र.९४२३११५१८२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.